


www.mahadbtmahait.gov.in

•सन २०१७-१८ पासून महाराष्ट्र शासनातर्फे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एकत्रित संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. या संकेतस्थळाचे नाव महाडीबीटी असे असून हे पोर्टल **(https://mahadbt.gov.in)** कार्यान्वित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. अर्ज ऑनलाईन असल्याने विद्यार्थ्यांच्या वेळेची बचत होणार आहे. या योजनेसंदर्भातील माहिती शाळा आणि महाविद्यालयांनी दर्शनी भागात लावण्याबाबत आणि पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

•डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजना देण्यात येणारे विभाग

**1.**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**2.**आदिवासी विकास विभाग

**3.**उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग

**4.**अल्पसंख्याक विकास विभाग

**5.**शालेय शिक्षण विभाग

••डीबीटी **(DBT)** पोर्टलवर नोंदणी करण्याची पद्धत –

अ) ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी पूर्वतयारी :-

•• विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक काढणे आवश्यक आहे.

•• विद्यार्थ्यांनी कोअर बँकींग सुविधा असलेल्या बँकेच्या शाखेमध्ये खाते उघडणे आवश्यक आहे.

•• विद्यार्थ्यांनी आपला जातीचा दाखला, जात पडताळणी दाखला, १०वी/मागील परीक्षा उत्तीर्ण झालेला दाखला व गुणपत्रक, जन्मतारखेचा पुरावा, रहिवास प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, प्रवेशित महाविद्यालयाची माहिती, प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती, अभ्यासक्रमाचा कालावधी, बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, आधार कार्ड, दिव्यांग (अपंग) असल्यास दिव्यांगाचा दाखला, शिधापत्रिका इ. कागदपत्रे तयार ठेवावीत.

ब ) डीबीटी पोर्टलवर नोंदणी कशी करावी :-

•• आपण कोणत्याही ब्राऊझरचा वापर करुन (उदा. **Internet Explorer, Google Chrome / Mozilla firefox** इ.)

•• पुढे **https://mahadbt.gov.in** या वेबसाईटवर जाऊन 'नवीन नोंदणी' या बटनावर क्लिक करावे.

•• प्रत्येक विद्यार्थ्याने (ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी **e-scholarship** पोर्टलवर नोंदणी केली होती. त्यांनी सुद्धा) **mahadbt** पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. आधार क्रमांकाचा उपयोग करुन नोंदणी करावी. त्यासाठी 'आधार कार्ड आहे?' असेल तर 'होय' व नसेल तर 'नाही' वर क्लिक करावे.

•• त्यानंतर '**OTP**' हा पर्याय निवडा.

•• वैध आधार क्रमांक टाकल्यानंतर '**OTP** पाठवा' बटन क्लिक करावे.

•• मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेला ओटीपी (**One Time Password**) टाकून 'पडताळणी करा' हे बटन क्लिक करावे.

•• उपलब्ध विंडोमध्ये नाव, जन्म दिनांक, फोन नंबर, पत्ता आधार संलग्न बँक खाते नंबर इ. आधार कार्डवरील माहिती आपोआप दिसेल.

•• आधार क्रमांक नसल्यास 'आधार कार्ड नाही' हा पर्याय निवडा आणि आवश्यक ती माहिती भरावी व कागदपत्रे अपलोड करावीत.

•• नोंदणी अर्जाच्या विंडोमधील सर्व माहिती भरावी.

•• स्वतःचा **User Name** व **Password** तयार करावा.

क) डीबीटी पोर्टलवर अर्ज कसा भरावा :-

•• महाडीबीटी पोर्टलवर **Log in** करण्यासाठी '**Select User**' वर जाऊन 'विद्यार्थी' हा पर्याय निवडा.

•• **User Name** व **Password** टाकून **Log in** व्हावे.

•• **Log in** झाल्यावर **Windows** मधील 'योजना तपशील' यावर क्लिक करावे. त्यानंतर विभागवार योजना आपण पाहू व निवडू शकाल.

•• तुम्हास ज्या योजनेसाठी अर्ज करावयाचा आहे त्यायोजनेसमोरी 'पहा' यावर क्लिक करावे.

•• तुम्ही कोणत्या योजना जसे. मॅट्रिकपूर्व/मॅट्रिकोत्तर (शालेय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर) नुसार पर्याय निवडावा.

•• आपली आवश्यक माहिती भरावी जसे. जात, प्रवर्ग, महाराष्ट्राचे रहिवासी, अपंगत्व, कौटुंबीक उत्पन्न, इ.

•• पालकाची माहिती, शाळा/महाविद्यालयाची माहिती भरावी.

•• आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अभ्यासक्रमाचा तपशील इ. माहिती भरुन **Submit** बटनवर क्लिक करावे.

•महाडीबीटी पोर्टलचा लाभ :

•'आधार प्रमाणिकरण' सह थेट लाभ देण्यासाठी या प्रणालीची सुरूवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

•• राज्यातील सर्व विभागांमधील विविध योजनांच्या अंतर्गत लाभार्थींना महाडीबीटी पोर्टल द्वारे लाभ

•• हे पोर्टल डीबीटी आणि सेवा प्रक्रियांच्या विविध अंतर्गत कार्यांमध्ये कार्यक्षमता आणेल

•• विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थी ऑनलाइन अर्ज करु शकतात

•• लाभार्थी फक्त 'आधार प्रमाणीकरण' वापरून अनेक योजनांचा लाभ घेऊ शकतात.

•• योजनेचा लाभ मिळविण्यासाठी बराच काळ थांबण्याची आवश्यकता नाही

•• लाभार्थींना आता रांगेत उभे राहण्याची गरज नाही, कोणाला लाच देण्याची गरज नाही.

•महाडीबीटी पोर्टलद्वारे सर्व शासकीय योजनांचा लाभ लाभार्थींच्या बँक खात्यांमध्ये थेट हस्तांतरित केला जाईल. ही आधार-प्रमाणीकृत इलेक्ट्रॉनिक यंत्रणा आहे ज्यामुळे राज्यातील विविध विभागांद्वारे अंमलात आणलेल्या ४० हून अधिक योजनांच्या फायद्यांचे थेट हस्तांतरण करण्यास मदत होणार आहे.

**•Department Name :- Social Justice and Special Assisstance(सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग)**

1.Government of India Post-Matric Scholarship.

2.Post-Matric Scholarship for persons with disability

3.Post-Matric Tuition Fee and Examination Fee (Freeship)

4.Rajarshri Chhatrapati Shahu Maharaj Merit Scholarship.

•**SC** किमान अटी व पात्रता

अर्जदार भारतीय नागरी व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा

**q**अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा

**q**अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न **2,50000**लाख पेक्षा जास्त नसावे

अर्जदाराचे बँक खाते स्वतंत्र असावे जॉईट खाते नसावे

**q**नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत कि मान **50** टक्के गुण मिळणे आवश्यक आहेत.

•

Department Name:ST

•

1.Handicap Scholarship

2.Post Matric Scholarship Scheme (Government Of India ).

3.Tuition Fee &  Exam Fee for Tribal Students ( Freeship).

•**ST** किमान अटी व पात्रता

**q**अर्जदार भारतीय नागरी व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा

**q**अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा

**q**अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न **2,50000**लाख पेक्षा जास्त नसावे

अर्जदाराचे बँक खाते स्वतंत्र असावे जॉईट खाते नसावे

**q**नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत कि मान **50** टक्के गुण मिळणे आवश्यक आहेत.

Department Name: VJNT,OBC and SBC Welfare Department

1)Post Matric Scholarship to OBC Students.

2)Post Matric Scholarship to SBC Students.

3)Post Matric Scholarship to VJNT Students.

4)Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Merit Scholarship for students studying in 11th & 12th standard of VJNT & SBC category.

5)Tuition Fees and Examination Fees to OBC Students,SBC,VJNT (Free ship)

**OBC,VJNT(NTB,NTC,NTD),SBC** किमान अटी व पात्रता **:-**

**q**अर्जदार भारतीय नागरी व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा

**q**अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा

**q**अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न **100000**लाख पेक्षा जास्त नसावे

अर्जदाराचे बँक खाते स्वतंत्र असावे जॉईट खाते नसावे

**q**नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत कि मान **50** टक्के गुण मिळणे आवश्यक आहेत**.**

•

**स्कॉलरशिप फॉर्म सोबत जोडाव्याची कागदपत्रेखालील प्रमाणे जोडावीत.**

1)**Online From Print**

2)**Addmission Receipt**

3) **Income Certificate** २०२०-२१

4)**Domicile**

5)**Bank Passbook Xerox**

6)**Cast Certificate**

7)**Declaration From**

8)**Last Year Mark list**

9)**LC Xerox (Only For Cast)**

**शेवटच्या पानावर पाठीमागे User ID Password Mob No इ. लिहावे.**

✻ निरनिराळ्या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक कागदपत्रे :

| स्कॉलरशिप प्रकार | जात | उत्पन्न मर्यादा |
|---|---|---|
| भारत सरकार शिष्यवृत्ती | SC, ST | २ लाखापर्यंत |
| भारत सरकार फ्रिशिप | SC, ST | अमर्याद |
| भारत सरकार शिष्यवृत्ती | OBC, SBC, VJ/NT | १ लाखापर्यंत |
| भारत सरकार फ्रिशिप | OBC, SBC, VJ/NT | ६ लाखापर्यंत |

ऑफलाइन सवलती

•इ.बी.सी

• मुलींना मोफत शिक्षण

• प्राथमिक शिक्षक पाल्य सवलत **(PTC)**

• माध्यमिक शिक्षक पाल्य – जुनिअर पाल्य सवलत **(SST)**

• माजी सैनिक पाल्य मुले व मुली सवलत

• रयत सेवक पाल्य जूनिअर मुले व मुली

**(**मागील वर्षी या सवलती देण्यात आलेल्या नव्हत्या.

जर यावर्षी **ZP** ने मागणी केल्यास या सवलती कागदपत्रां सहित पात्र विद्यार्थ्यांकडून भरून घेतल्या जातील **)**

ईबीसी **/** पिटीसी **/** एस एस टी **/** एक्स – सर्विस मॅन सवलतींसाठी आवश्यक कागदपत्रे

•ई.बी.सी इयत्ता **11**वी **/12** वी मुले

• सरपंच नगराध्यक्ष नगरसेवक यांचा उत्पन्नाचा दाखला

• (उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा कमी असावे)

• रेशनिंग कार्ड झेरॉक्स सत्यप्रत

• आधार कार्ड झेरॉक्स सत्यप्रत

मुलींना मोफत शिक्षण (सवलतींसाठी आवश्यक कागदपत्रे )

•मुलींना मोफत शिक्षण इयत्ता अकरावी बारावी

• रेशनिंग कार्ड झेरॉक्स सत्यप्रत

• आधार कार्ड झेरॉक्स सत्यप्रत